# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 12.03.2025** **वार-शनिवार**

---

**शहा**

छत्रपती शिवरायांना महाराष्ट्रापुरतं मर्यादित ठेवू नका, महाराजांकडून देश आणि जग प्रेरणा घेत असल्याचं केंद्रीय गृह मंत्री अमित शाह यांनी आज रायगडावर सांगितलं. शिवाजी महाराजांच्या पुण्यतिथीनिमित्त आयोजित सोहळ्यात ते रायगडावर बोलत होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार, उपस्थित होते. त्यापूर्वी अमित शाह यांनी पाचाड इथं राजमाता जिजाऊ माँ साहेब यांच्या समाधीस्थळाचं दर्शन घेतलं.

**एआय**

उसाच्या बाबतीत स्वयंपूर्ण होण्यासाठी एआय तंत्रज्ञान कार्यक्षेत्रात राबविण्याचा निर्धार केला आहे, असं पुणे कृषी विज्ञान केंद्राचे विशेषज्ञ डॉ. विवेक भोईटे यांनी बारामती कृषी विज्ञान केंद्राच्या मदतीनं शेतकऱ्यांसाठी आयोजित प्रशिक्षण शिबिरात नुकतंच सांगितलं. यावेळी डॉक्टर भूषण गोसावी, एआय तज्ज्ञ संतोष जाधव, ऊस विकास अधिकारी सुरेश काळे यांनी एआयमुळे ऊस उत्पादनातील क्रांतीविषयी चित्रफितीद्वारे माहिती दिली.

**वाहने**

पुणे महापालिकेच्या वाहन विभागाकडील 15 वर्षांपेक्षा अधिक जुन्या झालेल्या 473 वाहनांच्या लिलावातून महापालिकेला 6 कोटी 85 लाख रुपये मिळाले आहेत. तसंच वाहनांच्या सुट्या भागांच्या लिलावातून 3 कोटी 30 लाख रुपये मिळाले आहेत.

**हडपसर**

अमृत भारत स्थानक योजने अंतर्गत हडपसर रेल्वे स्थानकाचा पहिला टप्पा येत्या दोन महिन्यात पूर्ण होईल अशी माहिती रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी काल मुंबईत पत्रकार परिषदेत दिली. या स्थानकाचं

काम सध्या वेगानं सुरू असून काही रेल्वेगाड्या स्थानकातून सोडल्या जात असल्याची माहिती पुणे रेल्वे विभागानं दिली आहे.

**मेकअप**

तरुणी आणि महिलांसाठी ग्लॅम मेकअप लूकची एकदिवसीय कार्यशाळा पुण्यातील यशस्वी अकॅडमी फॉर स्किल्सच्या फेमिना फ्लॉन्ट अकॅडमीच्या वतीनं आयोजित करण्यात आली होती. या मोफत कार्यशाळेत प्रात्यक्षिकासह ग्लॅम मेकअप लूक प्रकारामधील सर्व बाबींची माहिती प्रशिक्षिका निदा इनामदार यांनी दिली. मेकअपविषयी रुची असणाऱ्या युवती आणि महिलांनी कार्यशाळेत मोठी गर्दी केली होती.

**विश्वबंधुता**

संविधानाची प्रभावी अंमलबजावणी करून प्रत्येक व्यक्तीला समान न्याय, स्वातंत्र्य आणि सन्मानाची वागणूक द्यायची असेल, तर त्याला बंधुतेच्या विचारांची जोड द्यावीच लागेल, असं मत 27 व्या विश्वबंधुता साहित्य संमेलनाचे अध्यक्ष, ज्येष्ठ विचारवंत प्राध्यापक सुभाष वारे यांनी पुण्यात व्यक्त केलं. विश्वबंधुता साहित्य परिषद, रयत शिक्षण संस्थेचं डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय आणि काषाय प्रकाशन यांच्याद्वारे आयोजित 27 व्या विश्वबंधुता साहित्य संमेलनाच्या उद्घाटनावेळी अध्यक्ष म्हणून प्राध्यापक वारे बोलत होते. आर्थिक विषमतेच्या पार्श्वभूमीवर मानवी जीवनात समानतेचा धागा विणून प्रत्येक घटकाला सन्मान देणारा बंधुतेचा विचार अधिक व्यापक व्हायला हवा असं मत ज्येष्ठ साहित्यिका डॉक्टर अश्विनी धोंगडे यांनी यावेळी बोलताना व्यक्त केलं.

**नेमणूक**

महात्मा फुले राष्ट्रीय स्मारकासाठी आवश्यक जागेचं संपादन करण्यासाठी उपायुक्तांची नेमणूक करण्याचा निर्णय घेण्यात आला असून पुढील तीन महिन्यांत या भागातील संबंधितांशी सविस्तर चर्चा करून अहवाल तयार करण्याच्या सूचना पुणे महापालिकेचे आयुक्त डॉक्टर राजेंद्र भोसले यांनी दिल्या आहेत. महात्मा फुले वाडा आणि क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मारक या दोन वास्तू एकत्रित जोडण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे.

**तृतीयपंथी**

आंतरराष्ट्रीय तृतीयपंथी दिनानिमित्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका समाज विकास विभागाच्या वतीनं विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं. तृतीयपंथीय समाजाच्या विविध क्षेत्रात काम करणा-या व्यक्ती आणि संस्थांचा स्मृतीचिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

**जागर**

छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त ‘जागर संविधानाचा’ हा संयुक्त कार्यक्रम विश्वभूषण डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक महोत्सव समिती आणि रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गटाच्या वतीनं 13 ते 19 एप्रिल दरम्यान पुण्यात होणार असल्याची माहिती पक्षाचे प्रदेश संघटन सचिव परशुराम वाडेकर यांनी पत्रकार परिषदेत दिली. बोपोडीतील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे विविध कार्यक्रम होणार आहेत.

**हनुमान**

हनुमान जन्मोत्सव पुणे आणि परिसरात उत्साहात साजरा करण्यात येत आहे. मंदिरांमध्ये आज सकाळी सूर्योदयाच्या वेळी हनुमान जन्मोत्सवाचा पाळणा म्हणण्यात आला. तत्पूर्वी पहाटेपासून जन्म कीर्तनाचं आयोजन करण्यात आलं. अनेक ठिकाणी अन्नछत्र आणि सामाजिक उपक्रमही राबवण्यात आले.

**निधन**

प्रख्यात राष्ट्रीय कीर्तनकार हरि भक्त परायण सुधाताई धामणकर यांच काल दुपारी पुण्यात निधन झालं. गुरुकुल पद्धतीनं कीर्तन प्रशिक्षण देणाऱ्या तपोधाम प्रतिष्ठानच्या त्या संचालिका होत्या. यंदाच्या रामजन्म महोत्सवात देखील त्यांनी प्रवचन सेवा केली होती. काल संध्याकाळी त्यांच्या पार्थिव देहावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**